श्री·

पल्लीपतनकारिका·

प्रारंभः



मुंबईमध्यें·

सदाशिवबजाबाशास्त्री अमरापूरकर

यांनीं


आपल्ये ज्ञानदर्पण छापखान्यांत छापिलें·



आवृत्ति २री·

शके १७८० माघशु·२

सन्न १८५९



अनुक्रमणिका.

स्त्रियांच्याशरीराव
र·

श्रीगणेशायनमः॥अथपल्लीपतन
कारिकाप्रारंभः श्लोक.

अथातःसंप्रवक्ष्यामिफलंपल्याःप्रपातने॥
यद्यदंगेनृणांदृष्टंतत्तद्वाविशेषतः॥१॥ग-
र्गवाराहमांडव्यनारदाद्यैर्यथोदितम्॥तत्त
त्कार्यविशेषेणज्ञानव्यंस्फुविचक्षणैः॥२

अर्थ– मनुष्यांच्या अंगावर पाल पतन पावली असतां विशेषें करून काय फळ आहे तें सांगतों १ गर्ग. वाराह. मांडव्य. नारद इत्यादिकें ऋषीनीं जसें फळ सांगितलें आहे त्या प्रमाणें चतुर व कुशळ पुरुषांनीं समजावें तेंच आतां मी सांगतों॥२॥

शिरःशिखायांस्फुरवमातनोतिवामेकपो
लेप्रियदर्शनंस्यात्॥ दक्षेकपोलेप्रियसंप
दोस्यम्यात्केशबंधेपिचरोगबंधः॥३॥ ॥

अर्थ– मस्तकावर किंवा शेंडीवर पाल पडली अस

तां रूख प्राप्त होतें. आणि डाव्या गालावर पडली-
असतां मित्राचें दर्शन होईल. उजव्या गालावर
पडली असतां इष्ट संपत्ती मिळती. आणि केशबंधा
चे गर्थी पडली असतां रोग उत्पन्न होतो. ॥ ३ ॥ ॥

केशांतेनिधनंप्रोक्तंब्रह्मस्थानेमृतिप्रदं॥ ल
लाटेश्रियमाप्नोतिभ्रुवोस्तुधनहानिकृत्॥ ४
अर्थ—केशांच्या अग्रांवर पडली असतां नाश जाणा
वा. टाळूवर पडली असतां मरण जाणावें. कपाळा
वर पडलीतर लक्ष्मी प्राप्त होती. भ्रुकुटीवर पडली
असतां द्रव्य नाश होतो. ॥ ४ ॥ ॥ ॥

धनलाभोभ्रुवोर्मध्येदक्षिणेनयनेशुभं॥ वा-
मेबंधनमाप्नोतिवक्त्रेमिष्टान्नभोजनं॥ ५॥
अर्थ—भ्रुकुटीच्या मध्येंच जर पतन पावली तर द्र
व्य लाभ जाणावा. उजव्या नेत्रावर पडली असतां
शुभ जाणावें. आणि डाव्या नेत्रावर पडली तर बंधन

प्राप्त होतें. मुखावर पडली असतां मिष्टान्न भो-
जन मिळेल असें जाणावें ॥ ५ ॥ ॥

नासिकायांचसौभाग्यंनासाग्रेव्यसनंभ
वेत् ॥ लाभस्तुदक्षिणेकर्णेवामेकर्णेच
दुःखभाक् ॥ ६ ॥ ॥ अर्थ — नाकावर पडली
असतां सौभाग्य जाणावें. नाकाच्या अग्रभागीं
पडली असतां लाभ होतो, डाव्या कानावर पडली
असतां दुःख प्राप्त होतें ॥ ६ ॥ ॥ गंडप्रदेश
योर्मध्येभोजनंपरिकीर्तितम् ॥ अधरो
ष्ठेधनैश्वर्यमूर्ध्वोष्ठेकलहोभवेत् ॥ ७ ॥
अर्थ — गालाच्या मध्यभागीं जर पडली तर उत्तम
प्रकारचें जेवण मिळेल. खालच्या ओंठावर पड-
ली तर द्रव्य व ऐश्वर्य मिळेल, आणि वरच्या
ओंठावर पडली असता कलह होईल असें जाणावें.
संपुटेमृत्युमाप्नोतिचुबुकेराजविग्रहः ॥ सु

हृदागमनं कंठे बहिः कंठेरिपोर्भयं ॥ ८ ॥
अर्थ- ओष्ठसंपुटाचे ठायीं पडली असतां मरणातें पावतो. चुबुकावर (ओठाचे खाली हनुवटीचेवर) पडली असतां राजा बरोबर द्वेष घडेल असें जाणावें. कंठावर पडली असतां मित्राचें आगमन होईल. कंठाचे बाहेर पडली तर शत्रू पासून भय प्राप्त होईल ॥ ८ ॥

विजयं दक्षिणस्कंधे वामस्कंधे पराजयं ॥ अर्थहानिः करे प्रोक्ता मणिबंधे विभूषणं ॥ ९ ॥
अर्थ- उजव्या खांद्यावर पडली तर जय प्राप्त होतें. आणि डाव्या खांद्यावर पडली असतां पराजय होतो. हस्तावर पडली असतां द्रव्य नाश होतो. मनगटावर पडली असतां अलंकार प्राप्त होतात ॥ ९ ॥

करपृष्ठेर्थहानि स्यादंगुलीषु प्रियागमः ॥ नखेषु धनहानिः स्यात्करमध्ये महत्सुखं ॥ १० ॥
अर्थ- हस्ताच्या पृष्ठभागावर पडली असतां द्रव्य

नाशच जाणावा. बोटांवर पडली असतां इष्टपदार्थ प्राप्ती जाणावी. नखांवर पडलीनर द्रव्यनाश होतो. हस्ताचे मध्यभागीं पडली असतां महत्सुख होईल ॥ १०॥

पृष्ठेपरोक्षवार्तांचपार्श्वयोर्बंधुदर्शनम् ॥ उदरेधनसंप्राप्तिर्हृदिसौख्यविवर्धनम् ॥ ११ ॥

अर्थ — पाठीवर पडली असतां आपल्यामित्राची बातमी समजेल. दोन्ही कुक्षीवर पडली असतां बंधूची भेट होईल. पोटावर पडलीतर द्रव्य लाभ होईल. हृदयाचे ठायीं पडली असतां सौख्य वृद्धी होईल ॥ ११

स्तनयुग्मेचसौभाग्यंकक्षयोःस्त्रीसुखावहं वामेबाहौबहुक्लेशयशःस्याद्दक्षबाहुके ॥ १२ ॥

अर्थ — पुरुषाच्या स्तनहृदयाचे ठायीं पाल पडली तर सौभाग्य प्राप्त होते. उभय कांखेच्या ठायीं पतन पावली असतां स्त्रियांस सुख प्राप्त होते. डाव्या बाहूवर पडलीतर बहुत क्लेश होतात. उजव्या बाहूवर पडलीतर

यश प्राप्ती होती ॥ १२ ॥   ॥

करेकलत्रकलहंमणिबंधेधनापहम् ॥ कर
पृष्ठेचांगुलीषुभूषणंहानिकृन्नखे ॥ १३ ॥

अर्थ–डाव्या हातावर पडली असतां कुटुंबाशीं कल
ह होतो. आणि डाव्या मनगटावर पतन पावली असतां
द्रव्य नाश होतो, डाव्या हाताच्या पृष्ठभागावर आणि
बोटांवर पडली असतां भूषण प्राप्त होईल. डाव्या ह
ताच्या नखांवर पडली असतां नाश होईल. ॥ १३ ॥

करमध्येधनप्राप्तिः कुद्यांवस्त्रविभूषणं ॥
जयःकीर्तिर्भवेन्नाभौबंधनेव्याधिबंधनं ॥ १४ ॥

अर्थ–डाव्या हाताच्या मध्यभागीं पडली असतां
धन प्राप्ति होईल. कंबरेवर पडली असतां वस्त्र व
अलंकार प्राप्त होतील. नाभीवर पडली असतां
जय आणि कीर्ति हीं प्राप्त होतील. बंधनाचे ठाईं
(म्हणजे बस्तीवर) पडली तर रोग प्राप्त होईल ॥ १४ ॥

गुह्यस्थाने मृतिर्ज्ञेया ऊर्वोस्तु वस्त्रहानिकृत् ।
जघने धननाशाय गुदे रोगसमागमः ॥ १५ ॥

अर्थ — गुह्यस्थानीं पडली असतां मरण जाणावें, आणि मांड्यांवर पडली असतां वस्त्रांचा नाश जाणावा. जघनाचे ठाईं (म्ह० कंबरेच्या पुढल्या बाजूवर) पडली असतां द्रव्यनाश होतो. गुदस्थानीं पडली असतां रोगप्राप्ती जाणावी ॥ १५ ॥

॥ जान्वोस्तु बंधनं प्रोक्तं गुल्फयोः स्त्रीविनाशनं ॥ जंघयोर्गमनं प्रोक्तं पादयोर्बंधनं तथा ॥ १६ ॥

अर्थ — दोन्हीं गुडघ्यांवर पडली असतां बंधन प्राप्त होईल. घोंट्यांवर पडली असतां स्त्रीचा नाश जाणावा. जंघांवर (म्हणजे दोन्हीं गुडघ्यांच्या खालीं पायांपर्यंत) पडली असतां प्रवास घडेल असें जाणावें. दोन्हीं पायांवर पडली असतां बंधन प्राप्ति जाणावी ॥ १६ ॥

खुरयोर्मृत्युमाप्नोति पादपृष्ठे सुखप्रदम् ॥

पादांगुल्यांपुत्रनाशंपशुभृत्यांनखेषुच॥१७

अर्थ- खुर ह्मणजे लक्षणेंकरून जोडलेले पायांवर पडली असतां मृत्यु प्राप्ति, टांचेवर पडलीतर रूख प्राप्ति. पायांच्या बोटांवर पडली तर पुत्रनाश. पायांच्या नखांवर पडली असतां पशु व चाकर यांचा नाश॥१७॥

शत्रुक्षयोभवेत्पादतलेचैवंविनिर्णयः॥ यदुक्तंफलादेशंयत्स्वकीयप्रकीर्तितम्॥१८

अर्थ— पायांच्या तळव्यांवर पडली असतां शत्रुनाश होईल असा निश्चय शास्त्रांत केला आहे. एथपर्यंत जें फळ सांगितलें तें सर्व आपल्यासच प्राप्त होईल.

शयनेसंस्थितेपल्लीपतितायदिदृश्यते॥ तदाशुभफलंनस्यादशुभंवर्धतेसदा॥१९॥

अर्थ- शयनावर निजतांनां जरपाल पडून दृष्टीस पडली तर शुभ फळ नाहीं अशुभ जाणावें॥१९॥

उपविष्टासनेपल्लीपतितायदिदृश्यते॥शु

भाशुभफलंचैवतत्तथैवभविष्यति॥२०

अर्थ– आसनाचे ठायीं बसल्यावर जर पाल पडली असें पाहिलें तर कांहीं शुभ कांहीं अशुभ दोन्ही प्रकार जाणावें॥२०॥ ॥उच्छिष्टेसंस्थितापल्लीपतितायदिदृश्यते॥पतनेफलमादिष्टंबंधूनांचैवसौहृदं॥२१॥ ॥अर्थ–आपल्या पात्रावरचें उच्छिष्ट अन्नत्याचे ठाईं पडतांनां पाहिली तर बंधूंचें परस्पर सख्य होतें॥२१॥ ॥गम्यमानेचपल्लीतुपतिताचभवेद्यदि॥यथोक्तफलमादेश्यंशत्रूणांफलनिश्चयः॥२२॥ ॥अर्थ– आपण गमन करित असतां जर आपले अंगावर पडली तर जें फळ सांगितलें तें फळ आपले शत्रूस होईल असें जाणावें॥२२॥

आहारेपतितापल्लीतदाहारंपरित्यजेत्॥विनान्नंपतितापात्रेव्याधिशोकभयप्रदा॥२३

अर्थ– जेवावयाचें जें अन्न त्याजवर पाल पडली

असतां तें अन्न टाकून द्यावें. अन्नरहित पात्राचे ठाईं पडली असतां व्याधि शोक प्राप्त होईल.

पचनाग्नौपतनेपल्लीगृहिणीमृत्युमाप्नुयात्॥ देवालयेतुराज्ञश्चसभामध्येसभापतिः२४

अर्थ– ज्या अग्नीवर स्वयंपाक करावयाचा त्या अग्नीवर पडलीतर बायको मरेल. देवळांत पडलीतर राजाचा नाश होईल. सभेमध्यें पडलीतर सभापतीचा नाश.

गृहमध्येगृहस्थस्यद्वयोर्मध्येनरोत्तमः॥ पल्योःपरस्परंयुद्धपतितायदिदृश्यते॥ सर्वदुःखविनाशायस्फुरदंगृहवासिनाम्॥२५

अर्थ– घराच्या मध्यभागीं जर पडेल तर घरधन्याचा नाश होईल. दोघांच्या मध्यभागीं पडेल तर दोघांत जो उत्तम त्याचा नाश जाणावा. पालीचें परस्पर युद्ध होत असतां खालीं पडलेली पाहिली तर सर्व दुःखाचा नाश होईल. आणि घरांत राहणा

णाऱ्या माणसांस रूरव प्राप्ती जाणावी ॥ २५ ॥

यदिपल्याः प्रपातेनदीपोनाशयतेगृहे ॥ त

द्गृहंनाशमायातित्यजेन्मासत्रयंततः ॥ २६

अर्थ– पाली त्यापडण्याने जर घरांतील दिवा गे

ला तर तें घर नाश पावतें. यास्तव तीन महिनेपर्यंत

त्या घरांत राहूं नये ॥ २६ ॥ ॥ पल्याः प्रपात

नंवस्त्रेभूषणेचैवदृश्यते ॥ मानहा-

निर्भवेत्तस्यकलहोवाभविष्यति ॥ २७

अर्थ– आपलें वस्त्र व अलंकार यांजवर जर पाल पड

तांना दृष्टीस पडली तर आपले योग्यतेचा नाश किंवा

कलह होईल असें जाणावें ॥ २७ ॥ ॥ आयुधे

षुच दृश्येत यदिपल्याः प्रपातनम् ॥ स्व

हस्तयुद्धमाप्नोतिशत्रुहानिस्तदाभवेत् २८

अर्थ– तलवार इत्यादि आयुधांवर जर पाल पडली त-

र आपल्या हस्तें शत्रूशीं युद्ध होऊन शत्रू पराजय पा

नेन्ऽ॥ २८ ॥ ॥ ॥

वाहनेसंभङ्गश्येनगमनपरिदूषित॥ २९

अर्थ — आपल्यें जे अश्वादिक वाहन याचे ठायींजर गाल पडल्यानरकष्टयुक्त प्रवास होईल असें फळ आहे.

अन्यहस्तादिभेदेन फलभेदोभवेत्ध्रुवम्॥
स्वजन्मदिवसेजन्मनक्षत्रेनेधनेविधो॥ ३०

अर्थ — आतां कोणत्या नक्षत्रावर व कोणत्या दिवशीं पाल पडल्यीं असतां काय फळ हें सांगतो. आपल्या जन्म दिवसीं किंवा जन्म नक्षत्रदिवशीं अथवा आपल्यास वा गवा चंद्र असेल त्या दिवशीं॥ ३०॥ ॥

वैधृतौचव्यतीपातेउत्पातग्रहणादिषु॥ यम घंटमृत्युदग्धेदिनेचकालनाडिके॥ ३१॥

अर्थ — वैधृति व्यतीपात उत्पातदिवस ग्रहणादिक य मघंट मृत्युयोग दग्धयोग काळ नाडिका॥ ३१॥ ॥

विषनाड्यांक्रूरयुनेलग्नेक्रूरनिरीक्षि

ते ॥ कालेष्वेवंविजानीयाद्यदुक्तंन-
हिशोभनम् ॥ ३२ ॥ ॥ अर्थ- विषना
डी पापग्रहयुक्त व पापग्रहानें अवलोकिन असेंलग्न
इत्यादिक काळीं जरी पाल चांगल्या ठिकाणी पडली
तरी जें फळ पूर्वी सांगितलें तें नहोतां वाईट फळ-
प्राप्त होईल. ॥ ३२ ॥ ॥ दुर्निमित्तेतथा-
जातेनिधनंजायतेध्रुवम् ॥ इतिप-
ल्याःप्रपातेनफलंज्ञेयंविचक्षणेः ॥ ३३
अर्थ- त्याचरीती करून दुर्निमित्त झालें असतां
निश्चयें करून नाश होतो असें जाणावें. या प्रकारें कु
शळ पुरुषांनीं पालीच्या पडण्याचें फळ समजावें ॥ ३३ ॥
एतदेवफलंविद्यात्सरटस्यप्ररोहणं ॥ प-
ल्याःप्रपातनंचैवसरटस्यप्ररोहणं ॥ ३४ ॥
अर्थ- आणि हेंच पूर्वोक्त फळ सरड अंगावर चढल्या
असतां जाणावें. पालीचें पडणें आणि सरडाचें प्ररोहण-३४

निधनार्थायभवतिशुभंविद्याद्विपर्यये ॥पतनानंतरंतस्यरोहणंयदिजायते॥ पतनेफलमुत्कृष्टंरोहणेल्पफलंभवेत्॥ ३५

अर्थ– हे दोन्ही नाशार्थ होतात. परंतु विपर्यय असतां शुभ जाणावें. सरड अंगावर पडून जर चढला तर पडण्यानें फळ उत्तम आणि नुस्त्याच चढण्याचें त्यापेक्षां कमी असें जाणावें.

आरोहणंचोर्ध्ववक्त्रमधोवक्त्रंतुपातनं॥ भवेद्यदित्वशीघ्रेणतत्फलंजायतेध्रुवम्॥ ३६

अर्थ– आरोहण व पतन यांचीं लक्षणें सांगतो. तोंडवर करून जर अंगावर चढला तर त्याला आरोहण असें ह्मणावें. आणि खालीं तोंड करून जर उतरला तर त्याला पातन ह्मणावें. असें लक्षणायुक्त सरड्याचें आरोहण व पतन जर झालें तर शीघ्र फळप्राप्ती होईल ३६

पत्न्याःस्पर्शनमात्रेणसचेलंस्नानमाचरेत्॥

पंचगव्यंतथाप्राश्यकुर्यादाज्यावलोकनं ३७
अर्थ– आतां पुनः पाली विषयीं कांहीं प्रकार सांगतो. पालीचा स्पर्श झाला असतां लागलेंच वस्त्रा सकट स्नान करावें. आणि पंचगव्य प्राशन करून तुपामध्यें आपलें मुख पहावें. ॥३७॥ ॥अशक्तोवा सशक्तोवायदीच्छेच्छुभमात्मनः॥पुण्याहं वाचयित्वातुशांतिकर्मसमाचरेत् ॥३८॥
अर्थ– अशक्त असो अथवा शक्तिमान असो ज्याला आपल्या कल्याणाची इच्छा आहे त्याणे अगोदर असें करावें नंतर पुण्याहवाचन करूनशांतिकर्म करावें.
प्रतिरूपंस्रुवर्णेनतदर्धेनचवापुनः॥तदर्धेवायथाशक्त्याविन्तशाठ्यंनकारयेत् ॥३९
अर्थ– आतां शांतिचा प्रकार संक्षपानें सांगतो. दाहा पळ सुवर्णांची अथवा पांच पळ सुवर्णाची पलि प्रतिमा करावी. इतकें आपलें सामर्थ्य नसेलतर य

थाशक्ति वित्तशाठ्य न करितां सुवर्णाची प्रतिमा करावी.

रक्तवस्त्रेण संवेष्ट्य गंधपुष्पैः सुपूजयेत् ॥ त-
स्याग्रे मृन्मयं रम्यं कलशं जलपूरितं ॥ ४० ॥

अर्थ - ती प्रतिमा तांबड्या वस्त्रें करून वेष्टित करावी. नंतर गंधपुष्पांनीं तिचें पूजन करून मग त्या प्रतिमेच्या पुढें मृत्तिकेचा चांगला घट पाण्यानें भरावा ॥ ४०

वस्त्रमाल्यैरलंकृत्य स्थापयेत्तंदुलोपरि ॥ पं
चामृतं पंचगव्यं पंचरत्न समन्वितम् ॥ ४१ ॥

अर्थ - आणि वस्त्र पुष्पें इहीं करून तो कलश अलंकृत करून तांदुळावर स्थापन करावा त्या घटाचे ठायीं पंचामृत पंचगव्य पंचरत्नें ॥ ४१ ॥ ॥ पंच

त्वक् पंचपत्रं तु निक्षिपेत्सप्तमृत्तिकाः ॥ पूजये
ल्लोकपालांस्तु गंधपुष्पाक्षतादिभिः ॥ संपू-
ज्य विधिवद्भक्त्या तत्तन्मंत्रैश्च मंत्रवित् ॥ ४२

अर्थ - पांच साली पांच पत्री आणि सप्तमृत्तिका ठा

काव्या. मग गंध पुष्प अक्षतादिकें करून त्यांच्या त्यांच्या मंत्रांनीं भक्ती करून मंत्रज्ञ पुरुषानें इंद्रादिक लोकपाल यांची पूजा करावी ॥ ४२ ॥

अग्निसंस्थापनंकृत्वाहोमकर्मसमारभेत्
मृत्युंजयेतिमंत्रेणसमिद्भिःखादिरैःशुभैः ४३

अर्थ— नंतर अग्निस्थापन करावें. मग मृत्युंजयाच्या मंत्रें करून आणि चांगल्या खैराच्या समिधांनीं अग्नीचे ठायीं होम करावयास आरंभ करावा ॥ ४३ ॥

तिलैर्व्याहृतिभिर्होममष्टोत्तरसहस्रकं ॥ अथवाष्टोत्तरशतंकुर्यात्सम्यक्समाहितः ॥ ४४

अर्थ— अणखीं एकाग्रचित्त करून व व्याहृती म्हणून अष्टोत्तरसहस्र अथवा अष्टोत्तरशत तिळांचा होम करावा ॥ ४४ ॥ ॥ अभिषेकंततःकुर्यात्तद्गुरु-द्विजसत्तमैः ॥ पुण्यैर्वारुणसूक्तैर्वाशांतिसूक्तैस्तथैवच ॥ ४५ ॥ ॥ अर्थ— होम समाप्त झा

त्यावर पुण्य कारक वरुण सूक्तें व शांति सूक्तें इहीं करून ब्राह्मणांनीं यजमानाच्यामस्तकावर अभिषेक करावा ॥ ४५ ॥ ॥ एवंसम्यक्‌विधानेनशांति कर्मकरोतियः ॥ तस्यायुः श्रीर्जयोवृद्धिर्यशा ऽरोग्यंचजायते ॥ ४६ ॥ ॥ अर्थ- अशा चांगल्या विधानेंकरून जोशांतिकर्माचें आचरण करितो त्याला आयुष्य, श्री, जय, वृद्धि, यश, हीं प्राप्त होतात ॥ ४६ ॥

पल्लीसरटयोः शांतिर्विधानंशौनको दितम् ॥ यः समारभतेतस्यनिर्विघ्नं जायतेध्रुवम् ॥ ४७ ॥ ॥

अर्थ- पाल व सरड यांच्या शांतीचें विधान शौनक ऋषींनीं सांगितलें आहे. त्या प्रमाणें जो करितो त्याला विघ्नांची पीडा होत नाहीं.

इतिपल्लीसरटयोःशांतिः समाप्ता.

आतां स्त्रीलक्षणें सांगतो.

अथस्त्रीणांविशेषेणफलपल्याःप्रपातने
तत्तत्स्थानविशेषेणज्ञातव्यंसुविचक्षणैः १

अर्थ- यानंतर स्त्रियांच्या ज्याज्या स्थानीं पाल पडे ल त्यात्या स्थानाचीं विशेषें करून फळें सांगतों. तीं कुशळ पुरुषांनीं जाणावीं ॥ १ ॥ ॥ शिरसि श्रियमाप्नोतिब्रह्मस्थानेमृतिप्रदा ॥ केश बंधेरोगबंधः केशांतेमरणंभवेत् ॥ २ ॥

अर्थ- स्त्रियांच्या मस्तकावर पाल पडली असतां लक्ष्मी प्राप्त होती. आणि टाळूवर पडली असतां मृत्यू देणारी जाणावी. वेणीवर पडलीतर रोग प्राप्ति आणि केशांच्या अग्रावर पडलीतर मरण जाणावें.

ग्रीवायांकलहोनित्यंललाटेच्वधनक्षयः ॥
दक्षेकपोलेविधवावामेचप्रियदर्शनं ॥ ३ ॥

अर्थ- मानेवर पडली असतां नित्य कलह होतो.

रुपाळावर पडलीतर द्रव्य नाश होतो. उजव्या गाळाव
र पडलीतर विधवा होईल. डाव्या गालावर पडलीत
र आपले प्रियमित्राचें दर्शन होईल असें जाणावें ॥ ३

दीर्घायुर्दक्षिणेकर्णेवामेस्वर्णविभूषणं ॥
दक्षिणेनयनेदुःखंवामेवल्लभदर्शनं ॥ ४ ॥

अर्थ—उजव्या कानावर पडली असतां दीर्घायुष्य
असें जाणावें. डाव्या कानावर पडलीतर स्वर्णाल-
कारमिळतील. उजव्या नेत्रावर पडली असतां दुःख.
आणिडाव्यावर पडलीतर पतीचें दर्शन होईल ॥ ४

नासायांरोगसंप्राप्तिरूर्ध्वोष्ठेकलहोभवेत
॥ अधरोष्ठेधनैश्वर्यसंपुटेनिधनंभवेत् ॥ ५

अर्थ— नाकावर पडली असतां रोग प्राप्ती जाणा
वी. वरच्या ओंठावर पडलीतर कलह होईल. खाल
च्या ओंठावर पडलीतर द्रव्य व ऐश्वर्य यांची प्राप्ति
होईल. ओष्ठसंपुटावर पडलीतर नाश होतो ॥ ५ ॥

चुबुकेविग्रहः प्रोक्तोवक्रे मिष्टान्नभोजनं
कंठेविभूषणंप्रोक्तं कक्षयाः सुखसंपदः ६

अर्थ— चुबुक (म्हणजे खालच्या ओंठा खालचा व हनुवटी वेवरचाजो भाग तो) त्यावर पडली तर कलह होईल. आणि तोंडावर पडलीतर मिष्टान्नाचें भोजन मिळेल. कंठावर पडलीतर अळंकार प्राप्ति होईल. दोन्हीं काखेवर पडलीतर सुख संपत्ति मिळेल ६

पृष्ठेबंधुवियोगः स्यात्पार्श्वयोर्बंधुदर्शनं॥ स्कंधयोः स्त्रीसुखावाप्तिर्बाव्होर्मणिविभूषणं ७

अर्थ— स्त्रियांच्या पाठीवर पाल पडली तर बंधूंचा वियोग होईल. आणि दोन्हीं कुशीवर पडली असतां बंधूंची भेट होईल. दोन्हीं खांद्यावर पडली असतां आपल्यास सुख प्राप्ति जाणावी. दंडावर पडलीतर मणियुक्त अलंकार प्राप्ति जाणावी. ॥७॥ ॥

अर्थहानिः करेप्रोक्तावामेलाभोभवेद्ध्रुवं॥

दक्षिणेमणिबंधेचमनस्तापोधनक्षयः ॥ ८॥
अर्थ – उजव्या हातावर पडली असतां द्रव्याचा नाश जाणावा. डाव्या हातावर पडली असतां लाभ होईल. उजव्या मनगटावर पडली असतां मनाला संताप व द्रव्याचा नाश होतो. ॥ ८॥ ॥ वामेविभूषणंप्रोक्तंकरमध्ये महत्सुखं॥ करपृष्ठेकरांगुल्यांभूषणंहानिकृन्नखे ॥ ९॥
अर्थ – डाव्या मनगटावर पाल पडली तर अलंकार प्राप्ती होती. दोन्ही हाताच्या मध्यभागीं पडलीतर महत् सुख. त्या प्रमाणेंच उभय हस्तांच्या पृष्ठभागीं किंवा बोटांवर पडली असतां अलंकार प्राप्ती होती. परंतु नखांवर पडली असतां नाश होतो. ॥ ९॥
स्तनयोर्बाहुदुःखंस्यात्तद्दिसोरव्यविवर्द्धनम् ॥ कुक्षौसत्पुत्रलाभःस्यादुदराद्दा हमंगलम् ॥ १० ॥ ॥

अर्थ— दोन्ही स्तनावर पडली असतां बहुत दुःख होईल. हृदयाचे ठायीं पडली असतां सौख्य वृद्धी होईल. कुक्षीचे ठायीं पडली असतां सत्पुत्राची प्राप्ति होईल. आणि कन्येच्या पोटावर पडली असतां लग्न होईल असें जाणावें. इतर स्त्रियांच्या पोटावर पडली असतां कांहीं शुभदायक होईल ॥ १० ॥

नाभौ सत्कीर्तिबुद्धिः स्याद्गुह्यस्थाने मृतिर्भवेत् ॥ कट्यां च वस्त्रलाभः स्यात् गुदे रोगसमुद्भवः ॥ ११ ॥

अर्थ— स्त्रियांच्या नाभीवर पडली असतां सत्कीर्तीची बुद्धी होईल. गुह्यस्थानीं पडली असतां मरण प्राप्ति जाणावी. कंबरेवर पडली असतां वस्त्राचा लाभ होईल. गुदस्थानीं पडली तर रोगाचा उद्भव होईल असें जाणावें ॥ ११ ॥

उर्वोरपत्यसंप्राप्तिर्जान्वोर्बंधनमेव च ॥

जंघयोरर्थहानिः स्याद्गुल्फयोर्मर
णं भवेत् ॥ १२ ॥ ॥ अर्थ – दोन्हीं
मांड्यांवर पाल पडली असतां कन्या किंवा पुत्र
होईल. उभय गुडघ्यांवर पडली असतां बंधन प्रा
प्ति. आणि जंघेवर (म्ह० गुडघ्यापासून पायांपर्यंत)
पतन पावली असतां द्रव्याचा नाश होतो. आणि
दोन्ही घोट्यांवर पडलीतर मरण प्राप्ति जाणावी १२

दक्षिणचरणे यानं वामे शत्रुविना
शनम् ॥ अंगुलीष्वात्मजाः कोशो
धान्यलाभो नखेषु च ॥ १३ ॥ ॥
अर्थ – उजव्या पायावर पाल पडली असतां
गावांस जाणें होईल. डाव्या पायांवर पडली
तर शत्रूचा नाश होईल. पायांच्या बोटावर पड
ल्यास पुत्र व बहुत द्रव्य प्राप्ति होईल. आणि पा
यांच्या नखांवर पतन पावली असतां धान्य

प्राप्ति असें जाणावें ॥ १३ ॥

इतिपल्लीसरटयोःपतनादारोहणाद
पि ॥ स्त्रीणांज्ञेयविशेषणयदुक्तंमु
निपुंगवैः ॥ १४ ॥ ॥ ॥

अर्थ– या प्रकारें करून पालीच्या पडण्याचें व सर
डचढण्याचें फळ विशेषें करून ऋषींनीं स्त्रिया
सांगितलें आहे तें जाणावें ॥ १४ ॥ ॥ ॥

अथदिशाफल.

पूर्वायांचिंतितंकार्यमाग्नेय्यामग्निजंभयं ॥
याम्यनुमरणंविद्यान्नैरृत्यांकलहोभवेत् १५.

अर्थ– आतां आपले अंगावर पाल पडून ती जर पूर्वेस
जाईल तर ज्याचे अंगावर पडली त्याचें चिंतिलें कार्य-
सिद्धीस पावेल. अग्नि दिशेकडेस गेली तर अग्नी
पासून भय जाणावें. दक्षिण दिशेस गेली अस-
तां मरण प्राप्ति जाणावी. नैरृत्य दिशेस गेली तर

कलह होईल असें जाणावें. ॥१॥

पश्चिमे धनलाभाय वायव्यां व्याधिसं
भवः॥ कौबेर्यां कीर्तिलाभः स्यात् ईशा
न्यां चिंतितं भवेत्॥ पतनार्जनरपल्या
गतायाः फलमादिशेत्॥ २॥ ॥

अर्थ- पश्चिम दिशेस गेलीतर द्रव्यलाभ जाणावा,
वायव्य दिशेस गेलीतर रोग प्राप्ति, उत्तर दिशेस
गेली तर कीर्तिलाभ होईल. ईशान्य दिशेस गेली
तर चिंतिलें कार्य होईल हे सांगितलें फळ पाल अंगाव
र पडून गेली असतां जाणावें॥ २॥ ॥

अथतिथिफलम्

प्रतिपच्छोकसंप्राप्तिर्द्वितीया राज्य
दायिनी॥ तृतीयायां भवेल्लाभश्चतु
र्थ्यां रोग एवच॥ ३॥ ॥

अर्थ-आतां तिथींचें फळ सांगतों. प्रतिपदेचे दिवशीं

पाल अंगावर पडली असतां सर्व लोक अनुकूळ होतात. द्वितीयेचे दिवशीं पडली असतां राज्य प्राप्ति होईल. तृतीयेचे दिवशीं पडली तर लाभ होईल. चतुर्थीचे दिवशीं पडली तर रोग प्राप्ति असें जाणावें १

पंचम्यांत्वथषष्ठ्यांवा सप्तम्यांचधना
गमः॥ अष्टम्यांचनवम्यांचदशम्यां
मरणंध्रुवम्॥ २॥ ॥ ॥

अर्थ– पंचमी, षष्ठी, सप्तमी, ह्या तीन दिवशीं पाल पडली तर धन प्राप्ती जाणावी. अष्टमी, नवमी, दशमी, इतक्या दिवशीं पडली असतां मरण जाणावें॥ २॥

एकादश्यांपुत्रलाभो द्वादश्यांपुत्रसं
पदः॥ त्रयोदश्यांभवद्धानिरर्थना
शश्चतुर्दशी॥ ३॥ ॥

अर्थ– एकादशीचे दिवशीं पडली असतां पुत्र लाभ होईल. द्वादशीचे दिवशीं पडली असतां

पुत्र व संतति प्राप्त होईल असें जाणावें. त्रयो दशीचे दिवशीं पडलीतर हानि जाणावी. चतुर्द शीचे दिवशीं पडलीतर नाश होईल असें जाणावें.

पंचदश्याममावास्यांबंधुहा
निर्धनक्षयः ॥ ४ ॥ ॥

अर्थ– पोर्णिमा, अमावास्या, या दिवशीं पाल पडली असतां बंधुहानि व द्रव्यनाश अनुक्रमें फळ जाणावें ॥ ४ ॥ ॥ ॥

अथवारफलम्

सोमेबुधेगुरौशुक्रेधनलाभः
प्रजायते ॥ भानौभौमेतथाम
देधनहानिःप्रजायते ॥ १ ॥

अर्थ–आतां वाराचें फळ सांगतों- सोमवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, ह्या दिवशीं जर पाल

पडली तर धनलाभ होतो. रविवार, मंगळवार, शनिवार इतक्या दिवशीं पडली तर द्रव्यनाश होतो.

अथनक्षत्रफलम्.

अश्विन्यामायुरारोग्यंभरण्यांरोगएवच ॥ कृत्तिकाधनहानिःस्यात् ब्राह्मेचांद्रेचसंपदः ॥ १ ॥ ॥

अर्थ— आतां नक्षत्र फळें सांगतों. अश्विनीवर पाल पडली असतां आयुष्य आरोग्य ही प्राप्त होतात. भरणीवर पडली असतां रोग प्राप्ती जाणावी. कृत्तिकांवर पडली असतां धनहानि जाणावी. रोहिणी आणि मृग यांवर पडली असतां संपत्ति प्राप्त होईल असें जाणावें ॥ १ ॥ ॥

आर्द्रायांचभवेन्मृत्युःधनलाभः पुनर्वसौ ॥ पुष्येचैवभवेल्लाभः सार्पेचमरणंध्रुवम् ॥ २ ॥ ॥

अर्थ– आर्द्रांवर पडली असतां मृत्यु प्राप्त हो ईल. पुनर्वसूवर पडली असतां धनलाभ होईल. पुष्य नक्षत्रावर पडली असतां लाभ होईल. आश्लेषांवर पडल्यास निश्चयें करून मरण जाणावें २

मघा क्षेमकरी प्रोक्ता पूर्वायां रोगसं
पदः ॥ उत्तरादिचतुष्केषु शुभं भव
ति निश्चितम् ॥ ३ ॥ ॥

अर्थ– मघा नक्षत्रांवर पडली तर कल्याण प्राप्ति होती. पूर्वा नक्षत्रावर पडली असतां रोगाधिक्य जाणावें. उत्तरा, हस्त, चित्रा, स्वाती ह्या चार नक्षत्रांवर पडली तर निश्चयें करून शुभ फळ जाणावें.

विशाखा धननाशाय मैत्रे राज्यं
विनिर्दिशेत् ॥ ज्येष्ठायां निधनं
प्रोक्तं मूले चैव सुखागमः ॥ ४ ॥

अर्थ– विशाखांवर पडली असतां धननाश जाणा

वा. अनुराधांवर पडली असतां राज्य प्राप्ति जाणा
वी. ज्येष्ठावर पडली असतां नाश जाणावा. मूळा-
वर पडली असतां सुख प्राप्ति जाणावी. ॥ ४ ॥

पूर्वाषाढामृत्यवेस्यादुत्तराक्षेमका
रिणी ॥ श्रवणेराज्यसंप्राप्तिर्धनि
ष्ठायांधनक्षयः ॥ ५ ॥ ॥

अर्थ— पूर्वाषाढावर पडली असतां मृत्यु प्राप्ति
जाणावी. उत्तराषाढावर पडल्यास कल्याण प्राप्ति.
श्रवणावर राज्य प्राप्ति, धनिष्ठांवर नाश जाणावा ५

शततारासुचसुखंपूर्वाभाद्रप-
दाशुभा ॥ शुभोत्तराभाद्रपदार
वत्यांराज्यदायिनी ॥ ६ ॥ ॥

अर्थ— शततारका नक्षत्रावर पाल पडली असतां
सुख प्राप्ती जाणावी. पूर्वाभाद्रपदांवर पडली अ-
सतां शुभ जाणावें. उत्तराभाद्रपदांवर शुभ. रेवती

अथकरणफलं

नागेचतुष्पदेशोको भद्रायांमर
णंध्रुवम् ॥ शेषाणिशुभदानि
स्युः करणानिसदैवहि ॥ १ ॥

अर्थ- आतां करण फळ सांगतो. नाग, च-
तुष्पाद यांजवर पाल पडली असतां शोक
कारक जाणावी. भद्रांवर पडल्यास निश्चयें
करून मरण जाणावें. या शिवाय दुसऱ्या
करणांवर पाल पडली असतां शुभदाय
क जाणावी ॥ १ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥

इतिपल्लीपतनकारिका.
समाप्ता.

संवत् १९१५ । १६